# - प्रतिज्ञापत्र -

"कवी मंगेश पाडगांवकरांच्या कवितेची वैशिष्ट्ये" ('जिप्सी' या कवितासंग्राच्या अनुषंगाने) या विषयावरील सदरचा शोधनिबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) परीक्षेसाठी लिहिला आहे. हा शोधनिबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही विद्यापीठाने परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कोल्हापूर
मे, २००७

*प्रा. महेश दत्त कळेकर,*
जनता हायस्कूल, ज्यूनि. कॉलेज, शिरोळ,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

*डॉ. विभा शहा*
प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

# - प्रमाणपत्र -

श्री महेश दत्त कळेकर यांनी "कवी मंगेश पाडगांवकरांच्या कवितेची वैशिष्ट्ये" ('जिप्सी' या कवितासंग्राच्या अनुषंगाने) या विषयावर माझ्या मागदर्शनाने हा शोधनिबंध त्यांनी स्वत:च पूर्ण केला आहे. हा शोधनिबंध विद्यापीठाच्या एम्.फिल.पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांनी हे काम अत्यंत समाधानकारकरीतीने पूर्ण केले आहे. यापूर्वी हा अभ्यास त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठात पदवीसाठी सादर केलेला नाही. या शोधनिबंधातील कोणताही भाग यापूर्वी कुठेही प्रसिध्द झालेला नाही याची मला खात्री वाटते.

कोल्हापूर -

दिनांक - १९/५/०७

मार्गदर्शक

Dr. Mrs. V. S. Shah.
Head of Marathi Department
Mahavir College, Kolhapur.
☎ - 537323

# - ऋणनिर्देश -

शिरोळसारख्या ग्रामीण भागात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहूजन समाजाला शिक्षणाचे द्वार खूले करुन देण्यासाठी 'श्री. दत्त शिक्षण प्रसारक मंडळाची' स्थापना करुन ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य त्यासाठी वेचले त्या माझ्या ऋषीतुल्य आई-वडिलांचे अतोनात सहाय्य व आशीर्वाद मला मिळाले.

'जिप्सी' या कवितासंग्रहाच्या अनुषंगाने कवी मंगेश पाडगांवकरांच्या कवितेच्या वैशिष्ट्यांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या हेतूने लिहिलेला हा शोधनिबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल (मराठी) पदवीकरिता सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या शोधनिबंधातील विचार मी अभ्यासपूर्वक मांडला आहे. परंतू तो अंतिम सत्य आहे असे मी म्हणत नाही. अधिक अभ्यास व संशोधनाने त्यात निश्चितच भर पडू शकेल. या प्रबंध लेखनासाठी मला अनेक मान्यवर व्यक्तींचे व ग्रंथालयाचे बहुमोल मार्गदर्शन, प्रेमळ सहवास व सहकार्य लाभले. त्या सगळ्यांचा ऋणनिर्देश करणे मला अत्यंत आवश्यक वाटते.

माझ्या मार्गदर्शिका डॉ. विभा शहा यांच्या समर्थ मार्गदर्शनामुळेच मी हा शोधनिबंध पूर्ण करु शकलो. त्यांचे हे ऋण आयुष्यभर माझ्यावर राहिल. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याऐवजी त्यांच्या ऋणात राहण्यातच मला अधिक धन्यता वाटेल. याबरोबरच डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रविंद्र ठाकूर माझे वडिल श्री. कळेकर सर, प्रा. यशवंत चव्हाण (एस.के.पाटील कॉलेज, कुरुंदवाड), प्रा.डॉ.मोहन पाटील (कन्या

महाविद्यालय, जयसिंगपूर), प्रा. संतोष माने (आय.सी.आर.ई.कॉलेज गारगोटी) यांच्याशी विषयानुरुप केलेली चर्चा मला लेखनासाठी अत्यंत उपयुक्त ठरली. त्यांचा मी शतश: ऋणी आहे.

आमच्या कॉलेजच्या प्राचार्या व माझ्या मातोश्री सौ. पुष्पा कळेकर, माझी पत्नी प्रा.सौ.नंदिनी कळेकर, माझे सर्व सहकारी प्राध्यापक-शिक्षक, माझे बंधू डॉ. उमेश कळेकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या माझ्या वहिनी सौ.मुक्ता कळेकर, माझे मित्र श्री. दिपक काळे सर, श्री. आर.के.नदाफ सर, श्री. शैलेश कांबळे आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या सर्वांचे बहुमोल सहकार्य मला लाभले, त्यांचाही मला आवर्जून उल्लेख करावा लागेल.

श्री. संदीप आबिटकर यांनी वेळेत व व्यवस्थित हा शोधनिबंध टंकलिखित करुन दिला. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

*प्रा. महेश दत्त कळेकर*



मंगेश पाडगांवकर

साईप्रसाद, प्लॉट नं० १२५/अ, सायन (पश्चिम) मुंबई ४०००२२ • फोन २४०७२१९७

नको निराश सुरू रात्र ही उदास जरी,
दिवा करात धरू रात्र ही उदास जरी;

फुले जिथे होती राहिले तिथे काटे,
नकोस दुःख स्मरू रात्र ही उदास जरी;

पहाड दुर्गम मी लंघिले तुझ्यासंगे,
पुन्हा प्रवास सुरू रात्र ही उदास जरी;

पडेल दान कसे नेहमी मनाजोगे ?
कधी हसून हरू रात्र ही उदास जरी;

पदोपदी चकवे, भरवसे जळालेले,
सुने जरा विसरू रात्र ही उदास जरी;

थकून पाय असे लागतेच थांबावे,
सुरात सूर भरू रात्र ही उदास जरी.

मंगेश पाडगांवकर